## माथेफिरू

माथेफिरूच्या पायी ठेविला मी माथा
क्रूरकर्म्याने त्या पाठी घातल्या लाथा
कळवळलो आरंभिली त्याची स्तुती
पालटला खुश होऊनी दिली बिदागी ||१||

म्हणता आहे शेजारी किती सज्जन
भडकला देऊ लागला शिव्या शाप
सांगता शेजाऱ्याने पाठविली भेट
उठला गेला शेजाऱ्याच्या घरी थेट ||२||

– नारायण
१०/०८/२३